| | |
|---|---|
| MHPU240012972018 | दुंदा सरवदे<br>वि.<br>जानकू पारधी |

## निशाणी क्रमांक २२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी एकमेव प्रतिवादी मयत झाल्याने झालेली अबेंटमेंट रद्दबातल करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. प्रस्तावित वारसांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

०३. उभयपक्षकारातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. उभयपक्षकारातर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे दिसुन येते की, प्रतिवादी हा दिनांक १२.०५.२०२१ रोजी मयत झालेला आहे. त्याबाबत उभयपक्षकारा दरम्यान दुमत नाही. त्याचा मृत्यूचा दाखला निशाणी २१ सोबत दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०४.०७.२०२२ रोजी म्हणजेच दहा महिन्यानंतर दाखल केलेला आहे. अर्जात दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. परंतु, दावा ठराव व निरंतर ताकीदीकरीता असल्याने, न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी अर्ज मंजूर करणे उचित होते. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास दहा

महिन्यांचा विलंब केल्यामुळे त्यांच्यावर रक्कम ५००/– कॉस्टस् बसवणे ऊचित होते. या सर्व बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येतो –

अर्ज, रक्कम रु. ५००/– सरकार जमा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2025.09.22 14:50:58 +0530

(श्री. अविनाश म. पाटील)

दिनांकः– २२.०९.२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

नियमित दिवाणी दावा क्र. १५०/२०१८

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gaurav A. Bobade. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 22.09.2025. |
| Corrected on | : 22.09.2025. |
| Signed on | : 22.09.2025. |